S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON CENTRAL LIBRARY YEOLA DIST. NASHIK

Please Consider the Environment Before Printing… **Date: 12/02/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष



## कवयित्री, लेखिका, नाटककार पद्मा गोळे

पद्मा गोळे या नामवंत कवयित्री म्हणून परिचित होत्या. त्यांचा जन्म १० जुलै १९१३ रोजी तासगाव येथील पटवर्धन राजघराण्यात झाला. त्यांचे शिक्षण पुण्याच्या श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महाविद्यालयातून एम.ए. पदव्युत्तर अभ्यासक्रमापर्यंत झाले. लेखनाची सुरुवात शाळेत असताना नाटकापासून झाली. पुढील आयुष्यात मात्र त्यांनी सातत्याने काव्यलेखन केले. 'प्रीतिपथावर' (१९४७), 'नीहार' (१९५४), 'स्वप्नजा' (१९६२), 'आकाशवेडी' (१९६८), व 'श्रावणमेघ' (१९८८) हे काव्यसंग्रह; 'नवी जाणीव', 'रायगडावरील एक रात्र', 'एक स्वप्न' या नाटिका; आणि 'वाळवंटातील वाट' (सामूहिक लेखन १९७०) ही कादंबरी; अशी लेखनसंपदा त्यांच्या नावावर जमा आहे. गांधीवादी चळवळीमुळे स्त्रीवादी लेखिका बनण्यास प्रेरित झालेल्या श्रीमंत भारतीय कुटुंबातील अनेक महिलांपैकी त्या एक होत्या. त्यांच्या कवितेवर राम गणेश गडकरी, त्र्यंबक बापूजी ठोंबरे आणि यशवंत दिनकर पेंढारकर यांच्या लेखनाचा मोठा प्रभाव होता.

प्रितिपथावर या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहावर तांब्यांचा प्रभाव असला, तरी अनुकरणाचा हा टप्पा लवकरच ओलांडून त्यांच्या कवितेने पृथगात्म रूप धारण केले. स्वत:च्या उत्कट अनुभवांशी प्रामाणिक राहिल्याने त्यांची कविता परिपक्व आणि समृद्ध होत गेली. एका संवेदनशील, अंतर्मुख स्त्रीमनाचे विविध विलोभनीय आविष्कार त्यांच्या कवितेत आढळतात. त्यांच्या रसिक, चिंतनशील आणि स्वप्नदर्शी व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय त्यातून येतो. स्निग्ध सूर, संपन्न निसर्गप्रतिमा आणि शालीन संयम ही त्यांच्या कवितेची काही लक्षणीय वैशिष्ट्ये. स्वप्नजा या त्यांच्या काव्यसंग्रहाला महाराष्ट्र राज्य शासनाचे प्रथम पारितोषिक मिळाले, तसेच त्यांच्या रायगडावरील एक रात्र व इतर नाटिका या बालनाट्यांच्या पुस्तकालाही महाराष्ट्र राज्य शासनाचे पारितोषिक मिळाले आहे. पद्मा गोळे यांचे १२ फेब्रुवारी १९९८ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Feb 12, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401